ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार,
उद्योगधंदे, बँकिंग,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख २५ एप्रिल, १९५१ अंक १७

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.**

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६९,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष. न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. श्री. बा. ग. धंडुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानाजिक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.

## पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.

४१२ शनवार पेठ, पुणें १.

तारेचा पत्ता:—सॅनकोसोप. टेलिफोन नं. ३११५

( जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तू पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था )

**संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.**

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक, सल्फेट व इतर खतें, पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड. ★

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वाटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धावपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट. ★

★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

संस्थेच्या अडत दुकानाचा पत्ता व टेलिफोन नं. ३२०५. } ११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.

पहिल्याच मूल्यमापनांत नफा वाटणारी

## दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट मुंबई.

★ प्रमाणशीर खर्चांत मिळेल असें फक्त निवडक काम घेणें हें कंपनीचें ध्येय आहे, व यांतच विमेदारांचें अंतिम हित आहे. ★

सर्वत्र प्रतिनिधि पाहिजेत.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

## कूळ व शेतजमीन कायदा

आवृत्ती दुसरी प्रसिद्ध झाली. किं. ४ रु. कूळकायदा ( १९३९ ) आवृत्ति ३ री किं. ३ रु., तुकडेबंदी व जमीन एकत्रीकरण कायदा किं २ रु. भाडेनियंत्रण कायदा किंमत २ रु., शेतकरी कर्जनिवारण कायदा किं ४॥ रु., मुंबई सावकारी कायदा किं. २॥ रु., द्विभार्या—प्रतिबंधक कायदा ( आवृत्ति ३ री ) किंमत १ रु., हिंदु घटस्फोट कायदा किं. १ रु., संडपावत्यांचें पुस्तक ८ आणे.

पत्ता:—लॉ अॅकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २

खालील कंपन्यांचा माल आमचेकडे
ठोकीनें मिळतो.
या मालाची यादी मागवा.
म्हैसूर किर्लोस्कर लि. .................. किर्लोस्कर बंधु, लि.
किर्लोस्कर इलेक्ट्रिक कं.....किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि.
ओगले ग्लास वर्क्स लि. ...................शिवाजी वर्क्स लि.
जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स ...... बेळगांव मोटार्स
पॅरी आणि कं. लि.
केळकर बंधु, लक्ष्मीरोड, पुणें २

## विविध माहिती

**किर्लोस्करांचा युरोपचा दौरा**—म्हैसूर किर्लोस्कर वर्क्सचे डेप्युटी मॅनेजर श्री. राजाराम लक्ष्मण किर्लोस्कर हे इंग्लंड व युरोपच्या दौऱ्यावर गेले आहेत. "प्रिसिजन' टूल्स तयार करण्याच्या कारखान्याची यंत्रसामुग्री मिळविणें आणि ह्या धंद्यांतील अद्यावत सुधारणांचें निरीक्षण करणें, ह्यासाठीं हा दौरा काढण्यांत आला आहे.

**मध्यप्रदेशांतील ट्रॅक्टर स्टेशन्स**- मध्यप्रदेश सरकारनें चालू वर्षी आणखी सहा ट्रॅक्टर स्टेशन्स उघडण्याचें ठरविलें आहे. अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेला मदत करण्यासाठीं हीं केंद्रें उघडण्यांत येणार आहेत. प्रत्येक केंद्रांत १० यंत्रचालित नांगर शेतकऱ्यांच्या उपयोगासाठी ठेवण्यांत येतील. मध्यप्रदेशांतील एकूण केंद्रांची संख्या आतां ९ झाली आहे.

**विश्वास अंगाशीं आला**- अमेरिकेंतील ग्रीन्स बॉर्स गांवाच्या नगरपालिकेनें नागरिकांच्या मोटारी उभ्या करण्यासाठीं एक जागा तयार केली होती. ह्या जागेंत गाडी उभी करण्यापूर्वी भाडें म्हणून पटींत पैसे टाकण्यांत यावेत अशी सूचना जागेवर लावण्यांत आली होती. मोटारवाल्यांच्या प्रामाणिकपणावर नगरपित्यांचा विश्वास होता. परंतु अनुभव मात्र उलटा आला. पेटींत जमणाऱ्या भाड्यापेक्षां अधिक मोटारी स्टँडवर उभ्या रहात असें आढळून आल्यानें ही व्यवस्था आतां बंद करण्यांत आली आहे.

**कोचीनला टायर्सचा कारखाना**—कोचीन सरकारच्या नियंत्रणाखालीं शहराजवळ लवकरच एक टायर्स तयार करण्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे. प्रत्यक्ष उत्पादनाच्या कामाला चालू वर्षअखेर प्रारंभ होईल असा अंदाज आहे. कारखान्याचें भांडवल सार्वजनिक रीत्या उभारण्यांत येणार आहे.

**रेडिओवरील जाहिरातींना आक्षेप**- इटालिअन नभोवाणीच्या ग्राहकांनीं इटालिअन नभोवाणीवर नुकसानभरपाईचा दावा लावला आहे. ग्राहकांचें म्हणणें असें कीं, ग्राहकांनीं परवाने घेऊन रेडिओवरील सर्व वेळ विकत घेतलेला आहे. त्या वेळांत जाहिरातींचा मजकूर सांगणें योग्य नाहीं. भारताच्या माहिती खात्याच्या मंत्र्यांनीं रेडिओवर जाहिराती सांगण्याला सरकारचा विरोध असल्याचें नुकतेंच जाहीर केलें आहे.

**ओरिसांत मँगेनीजचा कारखाना**—मँगेनीज धातू गाळण्याचा एक कारखाना ओरिसांत लवकरच काढण्यांत येणार आहे. ह्या कारखान्यांतून दरवर्षी २५,००० टन मँगेनीज मिळूं शकेल. एक अमेरिकन कंपनी हा कारखाना उभारीत आहे. १९५२ अखेर कारखान्याचें काम पूर्ण होईल. भांडवलापैकीं ४९ टक्के भांडवल भारतीय राहील; त्यांतील १० टक्के भांडवल भारतीय सरकार घेणार आहे. जितकें परकीय भांडवल गुंतविण्यांत येईल त्यावरील नफा परदेशीं पाठविण्याची सवलत देण्यांत आली आहे.

**जगांतील निम्मे लोक रोगग्रस्त**—जगांतील निम्मे लोक रोगानें पछाडलेले आहेत, अशी माहिती जागतिक आरोग्य संघटनेचे डॉ. ब्रँडी ह्यांनीं सांगितली. रोगग्रस्तांची वर्गवारी पुढीलप्रमाणें आहे. मलेरिआ ३० कोटी; क्षय ३० कोटी; महारोग ५० लाख; ह्याशिवाय इतर अनेक प्रकारच्या रोगांनीं पछाडलेलीं लक्षावधि माणसें आहेत. भारत, पाकिस्तान, सयाम, इत्यादि राष्ट्रांतील गुप्तरोगानें ग्रस्त झालेल्यांना पेनिसिलिन टोंचण्याची मोठी मोहीम सध्यां चालू आहे.

**रशिआंतील कापडाचें उत्पादन**—वाढती मागणी भागविण्यासाठी रशिआच्या कारखान्यांनीं कापसाचें कापड, बूट, केंसाळ प्राण्यांच्या कातड्याच्या वस्तू आणि रेशीम ह्या वस्तूंचें उत्पादन वाढविण्याचें ठरविलें आहे. कापडाचें उत्पादन १९५० च्या मानानें २ टक्के, रेशमाचें ३१ टक्के, बुटांचें १६ टक्के आणि केंसाळ कातड्यांचें २८ टक्के वाढविण्यांत येणार आहे.

**अमेरिकेच्या सांठेबाजीचा परिणाम**—शस्त्रास्त्रें वाढविण्यासाठी म्हणून अमेरिकेनें कांहीं महत्त्वाच्या वस्तूंचा सांठा करण्याचें धोरण स्वीकारलें आहे. त्यामुळें न्यूझीलंडमधील बहुतेक कारखान्यांना कच्च्या मालाचा तुटवडा पडूं लागला आहे. कामगारांना लागणारे कपडे तयार करण्याचा एक कारखाना तर दहा आठवड्यांच्या आंतच बंद होईल अशीं चिन्हें दिसत आहेत. अडचणींत अडचण म्हणून बंदरांतील कामगारांचे संपहि चालू आहेत.

औद्योगिक व शेतकी भव्य प्रदर्शन १९५१
—२६ एप्रिल १९५१ रोजीं सुरू होईल—
जागा— संभाजी पार्कसमोर, पुणें ४.
चक्रव्यूह रचनेंत
सुमारें २०० स्टॉल्स, आकार १०'×१०' भाडें रु.२०० फक्त. ५० टक्के ॲडव्हान्स पाठवून तावडतोब जागा रिझर्व्ह कराव्या.
जनरल स्टॉलमध्यें प्रदर्शनांत मांडण्यासाठीं आपापला माल पाठवावा; भाडें आकारमानाप्रमाणें रु. २५ पासून ते २०० पर्यंत.
प्रदर्शनाला करमणूक विभागाची जोड देण्यांत आली असून नाटकें इ. कार्यक्रमासाठीं भव्य थिएटरही बांधण्यांत येत आहे.
विशेष माहितीसाठीं जनरल सेक्रेटरी यांस लिहावें. | ग्रामोद्योग व सार्वजनिक संस्थांना भरपूर सवलतीचे दर
गांवांत चौकशीचा पत्ता—मे. एस. करी कं., दत्तमंदिराजवळ, बुधवार, पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. १५ एप्रिल, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## मोठ्या नोटा पुनः सुरू करण्याचें अगत्य

इंडियन बँक्स असोसिएशनची ४ थी वार्षिक सभा नुकतीच भरली होती. असोसिएशनचे अध्यक्ष, श्री. प्राणलाल देवकरण नानजी ह्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत पांचशें, हजार व दहा हजार रुपयेवाल्या नोटांच्या अभावीं होणाऱ्या गैरसोईचा उल्लेख केला व त्या नोटा पुनः सुरू करण्यांत येण्याचें अगत्य त्यांनीं प्रतिपादन केलें. रिझर्व्ह बँकेनें ह्यासंबंधांत भारत सरकारकडे अनुकूल शिफारस केली असल्याचें समजतें. १२ जानेवारी, १९४६ रोजीं १०० रु. वरील किंमतीच्या चलनी नोटांचा कायदेशीरपणा काढून घेणारा वटहुकूम सरकारनें काढला होता. काळ्या बाजारांत खोट्या नांवानें व्यवहार करणाऱ्या व कर चुकविणाऱ्या लोकांवर अनपेक्षित झडप घालून त्यांचें नियंत्रण करणें, हा प्रस्तुत वटहुकुमाचा उद्देश होता. मामुली मर्यादेबाहेर साचविलेल्या नोटा उजेडांत आणलें त्यामुळें धोक्याचें झालें काळ्या बाजारांत व्यवहार करणारांचें हें भांडवल मोडून टाकून तो बाजार कमी करण्याचा त्यांत हेतु होता. तो कितपत साध्य झाला, अजूनहि भारी किंमतीच्या नोटा प्रसृत करण्यामध्यें अडचणी आहेत काय, इत्यादि प्रश्नांचा विचार करण्याची वेळ आतां आली आहे. काळा बाजारवाल्यांचे नफे बाहेर पाडून त्यांवर कर लादण्याच्या, सरकारच्या प्रयत्नांचा जोम संपला आहे. तेव्हां, बँका आणि व्यापारी ह्यांची मोठ्या नोटांच्या अभावीं होणारी गैरसोय तशीच चालू ठेवण्याचें प्रयोजन उरलेलें नाहीं

लहान नोटा मोजून देण्यांत व मोजून घेण्यांत बँकांच्या नोकरवर्गाचा व गिऱ्हाइकांचा निष्कारण वेळ जातो, परंतु त्याहिपेक्षां मोठी अडचण एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं रोकड नेण्या-आणण्याच्या बाबतींत होते. सरकारी ट्रेझऱ्यांमार्फत वर्गावर्गी करण्याची सोय प्रत्येक ठिकाणीं नसते. त्यामुळें फार मोठाल्या रकमा इकडून-तिकडे ट्रंकांतन हलवाव्या लागतात. लहान नोटांचीं मोठालीं बंडलें लहान ट्रंकांतून मावत नाहींत आणि एस. टी. च्या बसेसमध्यें मोठ्या ट्रंका उतारूंच्या पायापाशीं ठेवता येत नाहींत; त्या बसेसच्या वर ठेवाव्या लागतात. अशा परिस्थितींतून मार्ग काढावा लागतो आणि त्यांतील धोका आणि खर्च बँकांस पत्करावा लागतो. गांवांतल्या गांवांतहि इकडून तिकडे मोठाल्या रकमा न्याव्या लागतात. मोठ्या किंमतीच्या नोटा असल्या म्हणजे त्यांचे नंबर टिपून ठेवणें सोपें व शक्य असतें आणि चोरी झाली किंवा दरोडा पडला तरी त्या नोटांचा दुरुपयोग केला जाणें अवघड होतें. जुन्या नोटांचे ऐवजीं नव्या नोटांचा प्रसार झाल्यावर, १९४६ पूर्वीच्या नोटा पुनः बाजारांत येण्याचा संभव उरलेला नाहीं. श्री. प्राणलाल ह्यांनीं मोठ्या नोटा पुनः सुरू करण्यासंबंधीं केलेल्या सूचनेस सर्व लहान-मोठ्या बँकांचा पाठिंबा असणार हें उघड आहे.

---

## अणुशक्तीच्या संशोधनाची प्रगति

ॲटॉमिक एनर्जी कमिशननं अणुशक्तीच्या दुर्मिळ खनिजांचा शोध भारतांत लावला आहे. ह्या खनिजांच्या संपत्तीचा अंदाज बांधण्यासाठी कमिशन कसून शोध करीत आहे. पूर्व आणि मध्य हिंदुस्थानांत युरेनियम देणारे पट्टे आढळले आहेत; त्या क्षेत्रांची तपशीलवार पहाणी सुरू आहे. युरेनियम खणून देण्यासाठीं खासगी कंपन्या पुढें याव्यात ह्याकरितां, निवणारें सर्व अशुद्ध युरेनियम खरीदण्यास कमिशन तयार आहे. अलावे येथें १५०० टनांचा मोनोझाइटचा कारखाना उभारण्यांत येत आहे; त्यासाठी दि इंडियन रेअर अर्थस लि. ही कंपनी स्थापण्यांत आली आहे. त्यास भारत सरकार आणि त्रावणकोर-कोचीन सरकार ह्यांचें आर्थिक साहाय्य आहे. युरेनियम आणि थोरियम कॉंपाउंड्ससाठींहि कारखाना उभारला जाईल. बेरिलियमच्या उत्पादनासाठी एक प्रायोगिक योजना जमशेदपूरच्या नॅशनल मेटालर्जिकल लॅबोरेटरींत चालू आहे. देशांतील बेरिलचे सर्व साठे कमिशन मिळवीत आहे.

---

## सिमेंटची किंमत फार वाढलेली नाहीं

"युद्धपूर्व किंमतीच्या मानानें सिमेंटची सध्याची किंमत फक्त ८३% ज्यास्त आहे. घरबांधणीस लागणारें इतर सामान ह्या मानानें किती तरी महागलें आहे! बर्मा टीक २८०%, वाळू ३३५%, खडी २८४%, विटा २२३% आणि लोखंड-पोलाद १६३% नें महाग झालें आहे. सिमेंट वापरणारांपैकी फारच थोड्यांच्या लक्षांत ही गोष्ट आलेली आढळते. ":—असोसिएटेड सिमेंट कंपनीज लि. चे अध्यक्ष, श्री. धरमसी एम. खटाव.

---

**बटाट्याच्या पिकाचा उच्चांक**—हुगळी भागांतील एका शेतकऱ्यानें एका एकरांत ६२२ पौंड बटाट्याचें पीक काढलें. २४ परगण्यांतील एका शेतकऱ्यानें दर एकरांत ६५ मण भाताचें पीक काढून दाखविलें आहे. हौरा भागांतील एका शेतकऱ्यानें एकट्यानें ६०० माकडें मारलीं. बटाट्याचें पीक काढणाऱ्या शेतकऱ्याला १,५०० रुपयांचें बक्षिस देण्यांत आलें. बंगाल सरकारनें अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेंतील एक भाग म्हणून एकण ४२,५६६ रुपयांचीं बक्षिसें वाटलीं.

**मध्यप्रांतांतील सहकारी संस्था**—१९५१ च्या मार्च महिन्यांत मध्यप्रांतांत ४४ सहकारी संस्था नोंदविण्यांत आल्या. त्यांपकीं ३३ शेती पतपेढ्या, ४ मल्टिपरपझ सहकारी संस्था, ३ स्टोअर सोसायटीज्, ३ पशुसुधार संस्था आणि १ विणकरांची सहकारी संस्था होत्या. पांच गांवांतून सहकाराचें शिक्षण देणारे वर्गही चालविण्यांत आले.

**तापी योजनेचें भवितव्य**—तापी योजनेसाठीं उभारण्यांत येणारें कर्ज मुदतीपूर्वी जमविण्यांत यावें. तसें यश येत नाहीं, ह्याबद्दल मुंबई सरकारचे सार्वजनिक कामविषयक मंत्री डॉ. मेहता ह्यांनीं खेद प्रकट केला. ही योजना पूर्ण झाल्यावर शेतकऱ्याला पावसावर अवलंबून न रहातां पिकें काढतां येतील व साखरेचे कारखानेहि निघूं शकतील, असें त्यांनीं सांगितलें.

## शस्त्रवाढ आणि महाग कच्चा माल

### ब्रिटनच्या निर्यातीवर पडणारा ताण

ब्रिटनच्या डॉलरच्या गंगाजळींत सुधारणा होत गेल्यामुळे कॅनडानें देऊं केलेल्या डॉलरच्या कर्जाचा उरलेला भाग घ्यावयाचा नाहीं असा निर्णय ब्रिटननें घेतला आहे. हें कर्ज कॅनडानें १९४६ सालीं मंजूर केलें होतें. परंतु ह्या सुधारलेल्या आर्थिक परिस्थितीनें सामान्य इंग्लिश नागरिकाला फारसें समाधान झालेलें दिसत नाहीं. ह्याचें कारण असें आहे कीं ह्यापूर्वी घेतलेल्या कर्जाची फेड ब्रिटनला अजून करावयाची आहे. गेल्या वर्षी ब्रिटनच्या परदेशीय व्यापारांत अनुकूल तफावत पडली होती. परंतु शस्त्रास्त्रांच्या वाढीचा कार्यक्रम आणि आवश्यक मालाची सांठवण ह्यांच्यापायीं ती तफावत अटून उलट प्रतिकूल तफावत पडणार आहे. १९५१ अखेर अमेरिकेकडून १९४६ सालीं घेतलेल्या कर्जाचा आणि उधार-उसनवार कर्जाचा पहिला हप्ता द्यावा लागेल. ही रक्कम ४४० कोटी डॉलर्स अथवा १५७ कोटी पौंड इतकी आहे. कॅनडाच्या कर्जाच्या फेडीचा पहिला हप्ता ११९.५ कोटी डॉलर्स ह्याच वर्षअखेर द्यावयाचा आहे. ह्याचा अर्थ असा कीं, १९५१-५२ सालीं डॉलरच्या कक्षेंतील देशांत ब्रिटनला १९५० सालापेक्षां अधिक माल निर्यात करावा लागेल, व शिवाय शस्त्रास्त्रांच्या वाढीलाही पैसे पुरवावे लागतील.

लंडन येथें डॉलर्सचा जो मध्यवर्ती संचय करण्यांत येतो, त्यांतील बहुतेक डॉलर्स पौंडी गटांतील देशांनीं भरलेले असतात ब्रिटनकडून डॉलर्सची भरती घेताचीच होते. हे देश पौंडाच्या बदला आपल्याला पाहिजे असलेला माल घेऊं शकतात; आणि म्हणून ते आपले डॉलर्स मध्यवर्ती संचयांत ठेवतात. ब्रिटननें पौंडी गटांतील देशांना माल निर्यात केला म्हणजे तो अप्रत्यक्ष रीत्या डॉलर्स देणाऱ्या देशांना निर्यात केल्यासारखाच आहे. ब्रिटननें आपला माल सरळ अमेरिकेला धाडून डॉलर्स मिळविण्याचा प्रयत्न केला तर तें शहाणपणाचें होणार नाहीं. कारण, त्यामुळें पौंडी गटांतील देशांची ब्रिटनची बरीच मोठी बाजारपेठ तुटेल. ह्यांतून एकच मार्ग आहे. तो असा कीं, जगाच्या सर्व भागांत ब्रिटनचा जितका माल निर्यात होतो, तितका न घाढतां कमी घाडावयाचा आणि त्यांतल्या त्यांत महत्त्वाच्या बाजारपेठांवरच निर्यात केंद्रित करावयाची. १९५० सालीं ब्रिटननें आयातीपेक्षां निर्यात बरीच अधिक केली. त्यामुळें ब्रिटनच्या परकीय हुंडणावळींत २० ते २५ कोटी पौंडांची अनुकूल तफावत पडली. शस्त्रास्त्रांच्या वाढीचा कार्यक्रम नसता तर ह्या गंगाजळीचा चांगला उपयोग झाला असता. परंतु शस्त्रास्त्रवाढीच्या कार्यक्रमामुळें राहाणींत काटकसर करूनच परदेशांचें देणें द्यावें लागेल. ब्रिटन आयात करीत असलेल्या कच्च्या मालाच्या किंमती वाढलेल्या असल्यामुळें १९५० सालीं ब्रिटननें जितका कच्चा माल आयात केला तितकाच १९५१ सालीं आयात करावयाचा झाल्यास, १९५१ सालीं ३० कोटी पौंड किंमतीच्या मालाची अधिक निर्यात करावी लागेल. निर्यात मालाच्या किंमती आहेत त्याच्यापेक्षा अधिक असत्या तर १९५१ अखेर जें देणं द्यावयाचें आहे, तें देणें सोपें गेलें असतें.

---

**उल्केंत सांपडलेली खनिजें**—१९४७ च्या फेब्रुवारी महिन्यांत आग्नेय रशिआंत ६,००० टन वजनाची एक उल्काची पडली होती. ह्या उल्केंत ९२ मूलद्रव्यांपैकीं २४ मूलद्रव्यें सांपडलीं आहेत. त्यांत सोनें व प्लॅटिनम् हींहि दोन आहेत.

## गहाण ठेवलेल्या शेअर्सचे संबंधांत बँकेचा अधिकार

### कलकत्ता हायकोर्टाचा ताजा निवाडा

नचिआप्पा चेट्टियारनें मद्रासच्या इंडियन बँक लि. च्या रंगून शाखेकडून ओव्हरड्राफ्ट घेतला त्यास तारण म्हणून इंडियन आयर्न अँड स्टील कंपनीचे २०० शेअर्स (व त्यासोबत नांव न घातलेली ट्रॅन्स्फर डीड्स) दिले. बँकेच्या मद्रास शाखेनें हे सर्व कागद रंगून शाखेस पाठविले, परंतु वाटेंत ते गहाळ झाले. बँकेनें इं. आ. अँड स्टील कंपनीकडे नवीं सर्टिफिकिटें तयार करून मागितलीं आणि कंपनीनें तीं मूळ शेअर धारण करणारे देसाई व अबदुल सतार हाजी दाउद ह्यांच्या नांवानें करून दिलीं. परंतु बँकेला ह्या दोघांच्या सहीचीं ट्रान्स्फर डीड्स सही करून मिळूं शकलीं नाहींत आणि मध्यंतरीं चेट्टियार हा नादार ठरला त्यामुळें तिला शेअर विकतांहि आले नाहींत. बँकेनें कलकत्ता हायकोर्टाकडे अर्ज करून वरील २०० शेअर्सची मालकी बँकेची आहे असा निवाडा करून मागितला. हायकोर्टानें अर्ज मंजूर केला.

---

## दि रत्नाकर बँक लि., कोल्हापूर

रत्नाकर बँकेत १९५० ह्या वर्षी ४९,३६३ रु. नफा झाला. त्यापैकीं १०,००० रु. रिझर्व्ह फंडांत टाकून आणि ऑर्डिनरी शेअर्सवर ३% करमाफ डिव्हिडंडसाठीं १४,९३१ रु. ची तरतूद करून २३,०८९ रु. पुढील हिशेबांत ओढण्यांत आले. त्यांतून कराची रक्कम देण्यांत येईल. बँकेच्या तरतेपणाची उत्कृष्ट कल्पना खालील संक्षिप्त ताळेबंदांतील आकड्यांवरून येईल.

(चेअरमन : बी. वी. पाटील, बी. ए., एलएल. बी. सांगली. व्हाइस चेअरमन : जी. एस. चौगुले, कोल्हापूर. मॅनेजर : एल. एन. शहा, बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी.)

### संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ५,०३,३०० | कॅश | १०,४६,५११ |
| रिझर्व्ह व इतर फंड | ६५,०२४ | इतर बँकांत | ७,३५,४९९ |
| ठेवी | ३५,००,१९५ | बिल्स डि. व प. | ५,०३,४०० |
| बिल्स | १,५०,४८३ | इन्व्हेस्टमेंट | ७,५६,७१७ |
| नफा | ४९,३६३ | कर्जे | ९,८१,०८७ |

---

### अर्बन बँकांना शेअर्स व डिबेंचर्स घेतां येणार

१९२७ च्या बॉम्बे कोऑपरेटिव्ह सोसायटीज् रूल्समध्यें करण्यांत यावयाच्या नियोजित दुरुस्तीचा मसुदा मुंबई सरकारच्या ता. २९ मार्च, १९५१ च्या गॅझेटचा भाग ४—व मध्यें प्रसिद्ध झाला असून त्या बाबतींत पाठवावयाच्या हरकती किंवा सूचना ३० एप्रिल, १९५१ पर्यंत मुंबई सरकारकडे पाठवाव्या. या मसुद्यानुसार २७ व्या नियमांत दुरुस्ती करण्यांत यावयाची आहे. कांहीं विशिष्ट प्रकारच्या अर्बन कोऑपरेटिव्ह बँकांना त्यांच्याजवळील जादा रक्कम १९१३ च्या इंडियन कंपनीज् अॅक्टाखालीं रजिस्टर झालेल्या कोणत्याहि कंपनीच्या शेअरमध्यें किंवा डिबेंचरमध्यें गुंतवितां यावी म्हणून ही दुरुस्ती करण्यांत येत आहे. मात्र अशा प्रकारें पैसे गुंतविण्याच्या बाबतींत सदरहू बँकांना बॉम्बे को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशनची मान्यता घ्यावी लागेल. दुरुस्ती मसुद्याबाबत पाठवावयाच्या हरकती किंवा सूचना मुंबई सरकारच्या विकास खात्याचे सेक्रेटरी, सर्कंटाइल बँक बिल्डिंग, मुंबई १ यांचेकडे, किंवा जिल्ह्यांचे कलेक्टर किंवा रजिस्ट्रार ऑफ को-ऑपरेटिव्ह सोसायटीज् पुणें यांच्याकडे पाठवाव्या.

## लहान धंदे विरुद्ध मोठे धंदे

### हैद्राबादमधील काड्याच्या पेट्यांचा धंदा

हैद्राबाद संस्थानांतील काड्याच्या पेट्यांचा पहिला कारखाना १९२८ साली निघाला, त्या वेळीं त्या कारखान्यांत अवघे २०० ते ४०० कामगार काम करीत होते. इतक्या लहान प्रमाणावर सुरू झालेल्या ह्या धंद्यानें १९४६ सालीं शिखर गांठलें. ह्या वर्षी हैद्राबाद संस्थानांत काड्याच्या पेट्यांचे बावीस कारखाने होते, आणि त्यामधून २,००० कायमचे आणि १५,००० हजार हंगामी मजूर काम करीत होते. ह्या उद्योगधंद्यांत गुंतलेलें एकूण भांडवल ४० लाखापर्यंत वाढलें; सर्व कारखान्यांत मिळून रोज ६,००० ग्रोस काड्याच्या पेट्या तयार होत. त्यांतील ४,००० ग्रोस खपत असत आणि बाकीच्या शिल्लक रहात. १९४७ सालापासून मात्र ह्या धंद्याला उतरती कळा लागली; बऱ्याच कारखान्यांना कुलपें ठोकावीं लागलीं. सध्यां फक्त ६ कारखाने चालू आहेत आणि तेहि पूर्णपणें चालू नाहींत. विम्को-सारख्या मोठ्या व अद्यावत् यंत्रसामुग्रीनें सुसज्ज असलेल्या कारखान्यांच्या मालाची हैद्राबाद संस्थानांत अनिर्बंध आयात होऊं लागली. हैद्राबादमधील काड्याच्या पेट्यांचे कारखाने ग्रामोद्योगासारखे लहान प्रमाणावर चालणारे होते. त्यांचा विम्को-सारख्या कारखान्यापुढें टिकाव लागला नाहीं. विम्को कारखान्यानें भारतांतील ७५ टक्के बाजार काबीज केला आहे. उरलेल्या २५ टक्के बाजारावरच छोट्या कारखान्यांना संतुष्ट रहावें लागतें. भारतांत असे कारखाने सुमारें १६० आहेत. युद्धापूर्वी ह्या कारखान्यांचें उत्पादन एकूण उत्पादनाच्या ५० टक्के होतें.

विम्कोसारख्या मोठ्या कारखान्यानें एक प्रकारची मक्तेदारी निर्माण केल्यामुळें लहान-सहान कारखाने बंद पडून बेकारी वाढत आहे. ज्यांनीं ह्या धंद्यांत भांडवल गुंतविलें आहे, त्यांचेंहि फार नुकसान होण्याचा संभव आहे. भारतांत महायुद्धाच्या काळीं आगपेट्यांचा तुटवडा पडला असतां हैद्राबादमधील कारखान्यांनीं ह्या रोजच्या वस्तूची गरज भागविली. तेव्हां ह्या धंद्याचा विशेष आस्थेवाईकपणानें विचार झाला पाहिजे असें मत व्यक्त करण्यांत येत आहे. भारतांतील उद्योगधंदे युद्धासारख्या संकटकाळीं चांगले भरभराटतात आणि नंतर प्रोत्साहनाच्या अभावीं, आणि मोठ्या भांडवलाच्या परकीय कारखान्यांच्या स्पर्धेमुळें घसर-गुंडीला लागतात असा अनुभव आहे. हैद्राबाद संस्थानतील ह्या महत्त्वाचा धंदा टिकवून धरण्यासाठीं पुढील सूचना करण्यांत आल्या आहेत. (१) बाहेरच्या प्रांतांतून येणाऱ्या आगपेट्यांवर बंधनें घालण्यांत यावीं अगर आयातीवर इतकी जकात बसविण्यांत यावी कीं तीमुळें मोठ्या परप्रांतीय कारखान्यांना हैद्राबादमधील छोट्या कारखान्यांना धंद्यांतून उठवितां येणें शक्य होणार नाहीं. (२) वहातूक व इतर बाबतींत स्थानिक धंदेवाल्यांना सवलती देणें. (३) धंद्यावरील स्थानिक कर व इतर कर कमी करणें, त्यामुळें धंदा निदान टिकून तरी राहील. (४) कारखान्यांना आपलें आसन स्थिर करतां यावें म्हणून कमी व्याजाच्या दरानें कर्जे मिळण्याची सोय करण्यांत यावी.

भारताच्या सध्यांच्या नियोजनविरहित अर्थव्यवस्थेंत एका धंद्याच्या बाबतींत सुद्धां ताळमेळ घालणें किती कठीण आहे ह्यांची कल्पना हैद्राबादमधील काड्याच्या पेट्यांच्या धंद्याच्या कहाणीवरून येण्यासारखी आहे. भारताची अर्थव्यवस्था संक्रमण कालांतून जात असल्यामुळें अशा प्रकारच्या अडचणी कांहीं दिवस अनिवार्यच आहेत.

---

**मोठ्या कुटुंबांना उत्तेजन**—लोकसंख्येंत वाढ व्हावी म्हणून मोठ्या कुटुंबांना बोनस देण्याची प्रथा हंगेरियन सरकारनें सुरू केली आहे. ज्या माता ११ अगर अधिक मुलांना जन्म देतील त्यांना सन्मानदर्शक पदवी देण्यांत येणार आहे व त्याशिवाय १० अगर अधिक मुलें जिवंत असणाऱ्या मातांना ५४ पौंड रोख बक्षिस देण्यांत येईल.

**सिनेमासाठीं होणारा खर्च**—भारतांतील फिल्म प्रदर्शकांच्या डिस्ट्रिब्यूटर्स असोसिएशननें सिनेमासाठीं प्रेक्षक किती खर्च करतात ह्यासंबंधीं एक अंदाज प्रसिद्ध केला आहे. गेल्या वर्षी नागरिकांनीं सिनेमा बघण्यासाठीं २९ कोटी रुपये खर्च केले. त्यांपैकीं सुमारें ७ कोटी निरनिराळ्या राज्य सरकारांच्या तिजोरींत करमणूक-कर म्हणून भरण्यांत आले.

**शीतपेटिकांचा कारखाना**—कटक येथें शीतपेटिका (रेफ्रिजरेटर्स) तयार करण्याच्या कारखान्याचा उद्घाटन समारंभ नुकताच झाला. भारतांतील हा पहिलाच कारखाना आहे. कारखान्याला ओरिसा सरकारची मदत आहे. कारखान्याची खूण म्हणून शीतपेटिकांवर ओरिसाच्या नव्या राजधानीचें भुवनेश्वराचें चित्र काढण्यांत येणार आहे.

**विजेच्या दिव्यांचा मोठा कारखाना**—इंग्लंडमधील नॉटिंगहॅमशायरमध्यें हारवर्थ ह्या ठिकाणीं विजेचे दिवे तयार करणारा कारखाना लवकरच चालू होईल. ह्या कारखान्यांत दररोज १० लाख विजेचे दिवे तयार होतील असें समजतें. इतके दिवे रोज तयार करणारा जगांतील हा पहिलाच मोठा कारखाना आहे.


दि

**युनायटेड कमर्शिअल बँक लि.**

**कलकत्ता.**

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६० लक्ष रु. |

**: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :**

जी. डी. बिर्ला (चेअरमन)

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका<br>व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या<br>व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतिलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

**: जनरल मॅनेजर :**

**बी. टी. ठाकूर**

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

## खेळणीं तयार करणाऱ्या धंद्यांतील क्रांति

### ब्रिटनचें वाढतें महत्त्व

ब्रिटनमधील यॉर्कशैंड या भागांत गेल्या कांहीं वर्षांत फार मोठा बदल घडून आला आहे. याचें कारण म्हणजे खेळणीं तयार करण्यामध्यें फार मोठे बदल घडून आले आहेत व खेळण्यांच्या जागतिक व्यापारांतहि क्रांति झाली आहे. १९५१ च्या जानेवारी महिन्यांत हॅरोगेट या ठिकाणीं भरलेल्या खेळणीं व फॅन्सी मालाच्या जत्रेमध्यें हा फरक स्पष्टपणें दिसून आला. युरोपांतील बहुतेक देशांतून व कॅनडांतूनहि आलेल्या प्रेक्षकांनीं पुढील नाताळासाठी खेळण्याच्या ऑर्डर्स नोंदविल्या. या जत्रेंत निरनिराळ्या २०० दुकानदारांनीं भाग घेतला होता. हॅरोगेट येथील या जत्रेला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झालें आहे व पुढील पांच वर्षे याच स्वरूपाची जत्रा या ठिकाणीं भरेल.

ब्रिटनला हल्लीं इतर कोणत्याहि देशापेक्षां खेळण्याच्या निर्गतीपासून जास्त प्राप्ती होत आहे. वर्षाला १ कोटी, ७० लक्ष पौंड किंमतीचीं खेळणीं अगदीं आधुनिक पद्धतीच्या यंत्रसुसज्ज कारखान्यांतून ब्रिटनमध्यें तयार होत असतात व यापैकीं एक चतुर्थांश किंमतीचीं खेळणीं निर्गत होत असतात; निर्गतपैकीं २५ टक्के किंमतीचा माल उत्तर व दक्षिण अमेरिकेंत खपतो. विशेषतः उत्तर अमेरिकेनें परदेशी खेळण्याच्या आयातीवर ७० टक्के जकात ठेविली आहे व परकी खेळण्यांना उत्तेजन थावयाचें नाहीं असें तेथील कारखानदारांचें धोरण असतांनाहि ब्रिटनकडून इतक्या प्रमाणांत खेळणी निर्गत होतात ही गोष्ट विशेष आहे.

खुद्द ब्रिटनच्या दृष्टीनें विचार केला असतां असें दिसतें कीं, हल्लीं ब्रिटनची खेळण्याची निर्गत १९३८ च्या मानानें दहा पट वाढली आहे. गेल्या शतकांत खेळणीं तयार करण्याच्या धंद्यांत जर्मनीचें वर्चस्व होतें व तें १९३९ पर्यंत टिकून होतें, परंतु पुढें ब्रिटनमधल्या कारखानदारांनीं शिशांची खेळणीं ओतकामाच्या पद्धतीनें तयार करण्यांत प्राविण्य संपादन केलें. पहिल्या महायुद्धाच्या काळापासून जर्मनीची खेळण्याच्या व्यापारांतील मक्तेमिरी संपुष्टांत आली. अमेरिकेनें परदेशाच्या खेळण्यांवर १९२२ मध्यें ७० टक्के जकात बसविली, ब्रिटननेंहि याच वेळीं प्रथम परदेशाच्या खेळण्यावर ५ टक्के जकात बसविली व हल्लीं २५ टक्के आहे. १९२२ नंतर उत्पादनांतील कौशल्य व यांत्रिक सुधारणा याच्या सहाय्यानें ब्रिटननें आपला खेळणीं तयार करण्याचा धंदा बराच वाढविला. पहिल्या महायुद्धानंतर वाढीस लागून दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळांत या धंद्याला ब्रिटनमध्यें निर्गत व्यापाराच्या दृष्टीनें महत्त्व प्राप्त झालें आहे. १९४९ मध्यें ४० लक्ष पौंड किंमतीचीं खेळणीं निर्गत झालीं. ब्रिटनचीं खेळणीं धातूचीं बनविलेलीं असतात. प्लॅस्टिक्स व मऊ लाकूड यापासूनहि कांहीं खेळणीं बनवितात. जास्त निर्गत धातूच्या खेळण्यांची होते. पूर्वींचीं खेळणीं बाहुली, भोंवरा इ. स्वरूपाचीं साधीं असत. हल्लींचीं खेळणी आगगाड्या, मोटारी अशा प्रकारचीं असतात व तीं करण्यांत इंजिनियरिंगचें कौशल्यहि असतें; एवढेंच नव्हे तर हल्लींचीं खेळणीं सजीव असतात. बाहुल्या गाणेंहि गातात.

### पगारी रजा

पगारी रजा ही प्रथा आतां अमेरिकन उद्योगधंद्यांत सर्वमान्य होऊं लागली आहे. २ जुलै, १९५० पासून होणाऱ्या आठवड्यांत रजेवर असलेल्या ५५ लाख कामगारांपैकीं ८० टक्के कामगारांचा पगार चालू होता.

### अहमदनगर जिल्हा सहकारी परिषद

गोदावरी–प्रवरा कॅनॉल को–ऑपरेटिव्ह परचेस अँन्ड सेल युनिअन लिमिटेड या संस्थेनें पुढाकार घेऊन रविवार ता. २९ व सोमवार ता. ३० एप्रिल १९५१ रोजीं नगर जिल्हा सहकारी परिषद, कोपरगांव येथें गांधी चौकांत रावबहादूर बोरावके यांचे विजयशंकर टॉकीजमध्यें बोलाविली आहे. परिषदेचें उद्घाटन श्री. वैकुंठराय मेहता, अर्थ व सहकार मंत्री, मुंबई राज्य, यांचे हस्तें होणार आहे. परिषदेचें अध्यक्षस्थान श्री. मालोजीराव नाईक निंबाळकर, उद्योग व मजूर मंत्री, मुंबई राज्य, हें स्वीकारणार आहेत. रविवारीं सकाळीं ८ वाजून २१ मिनिटांनीं कै. लल्लूभाई सामळदास मेमोरियल हॉल (युनियनच्या इमारतीचा) कोनशिला समारंभ प्रां. सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री. आर. जी. सरय्या ह्यांच्या हस्तें होईल.

### जागतिक बँकेची कर्जउभारणी

इंटर नॅशनल बँक फॉर रीकन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंटनें न्यूयॉर्कमध्यें ३% व्याजाचे २५ वर्षे मुदतीचे रोखे नुकतेच विक्रीस काढले. ह्या ५ कोटी डॉलर्सच्या रोख्यांपैकीं निम्मे रोखे चेस नॅशनल बँकप्रभृति बँकांनीं घेतले आहेत. वास्तविक, इंटर नॅशनल बँकेच्या रोख्यांवर जें व्याज पडतें, तें अमेरिकन सरकारच्या रोख्यांवरील व्याजापेक्षां फारसें अधिक नाहीं. तरीसुद्धां त्या रोख्यांस चांगली मागणी आहे. २५ कोटी डॉलर्सचें कर्ज इंटर नॅशनल बँकेने पूर्वी उभारलें होतें, तेव्हां तें खपविण्यासाठीं पुष्कळच प्रयत्न करावा लागला होता.


दि
# बँक ऑफ कराड, लि.
## ★ कराड ★

हेड ऑफिस:—कराड ( जि. उत्तर सातारा )

( स्थापना : १९४६ )

ह्या बँकेची शाखा सातारा येथें तारीख २६।२।१९५१ पासून उघडली आहे.

रेल्वे रिसीट वसुली व चेक, ड्राफ्ट्स वगैरे सर्व प्रकारचीं बिलें माफक कमिशनवर सातारा शाखेमार्फत वसूल केलीं जातील.

– : सातारा शाखेचा पत्ता :—

१५३, भवानी पेठ, सातारा सिटी.

म. वि. खंडकर.
मॅनेजर

## पाकिस्तानांतील उद्योगधंद्यांची वाढ

पाकिस्तानांत उद्योगधंद्यांची वाढ होण्यास दोन बाबी प्रतिकूल दिसून येतात. एक तर भांडवल पुरेशा प्रमाणांत पुढें येत नाहीं; आणि दुसरी गोष्ट पाण्याचा आणि औद्योगिक शक्तीचा अपुरा पुरवठा. १९५१ च्या प्रारंभापासून ह्या बाबतींत थोडीशी प्रगति होऊं लागली आहे. भारताप्रमाणेंच पाकिस्ताननेंही एका नियोजन–मंडळाची नेमणूक केलेली आहे.ह्या मंडळाला तज्ज्ञांचा सल्ला देण्याची सोय करण्यांत आलेली आहे. उद्योगधंद्यांसंबंधीं सुचविण्यांत आलेल्या खाजगी व सार्वजनिक योजनांचा एकमेकांशीं मेळ घालणें, पुनरावृत्ति टाळणें आणि समतोलपणा राखणें हीं कामें मंडळाकडे सोपविण्यांत आलेलीं आहेत. आंतरराष्ट्रीय परिस्थितींत गेल्या कांहीं महिन्यांत ज्या घडामोडी झाल्या त्यांच्या परिणाम स्वरूपी पाकिस्तानच्या औद्योगिक वृद्धीला कांहीं बाबतींत उत्तेजन मिळालें आहे. पण कांहीं बाबतींत अडथळेही,उत्पन्न झाले आहेत. कोरिआंतील युद्ध सुरू झाल्याबरोबर पाकिस्तानला परदेशी बाजारपेठांत अनुकूल परिस्थिति उत्पन्न झाली. अमेरिकेनें लांब धाग्याच्या कापसाची लागवड कमी केलेली होती. पण शस्त्रास्त्र–संवर्धनासाठीं ह्या कापसाची गरज वाढतच गेली. अर्थात् पाकिस्तानच्या लांब धाग्याच्या कापसाला अमेरिकेंत चांगली मागणी येऊं लागली. त्याचा फायदा घेऊन पाकिस्तान सरकारनें कापसाच्या एका गांठीवरील निर्यात–जकात ६० रुपयांवरून १०० रुपयांपर्यंत नेली. निर्यात-व्यापाराला आलेल्या तेजीमुळें पाकिस्तानच्या सहा वर्षांच्या औद्योगिक विकासाचा खर्च बाहेर निघूं शकेल असें वाटत होतें, परंतु ही अपेक्षा तितकीशी सफळ झाली नाहीं. व्यापारांत पैसा गुंतवून थोड्या मुदतींत त्याचा अधिक पैसा करण्याची शक्यता दिसल्याबरोबर दीर्घमुदतींत फलद्रूप होणाऱ्या औद्योगिक योजनांसाठीं पैसा गुंतविण्यास धनिक वर्ग पुढें येईनासा झाला.

तथापि प्रगति अगदींच थंडावली आहे असें मात्र नाहीं. कराचींत एक कापडाची गिरणी उघडण्यांत आली आहे. १९४७ सालीं असें ठरविण्यांत आलें होतें कीं, ५ वर्षांत १० लाख चात्या उपयोगांत आणाव्या. परंतु आतां त्याच्या-पलीकडे मजल मारण्याचें ठरलें आहे. कराचींत ७ नव्या गिरण्या काढण्यांत येत आहेत. त्या सर्वांत मिळून १,२५,००० चात्या असतील. सिंधमध्यें इतरहि आणखी दोन गिरण्या निघाल्या आहेत. त्या गिरण्यांत २०,२०० चात्या आहेत. त्याशिवाय चालू गिरण्यांतील चात्यांची संख्या २२,००० चात्यांनीं वाढविण्यांत आली आहे. कृत्रिम रेशमाचें कापड करणाऱ्या दोन गिरण्या निघाल्या आहेत. प्रत्येक गिरणींत २५० माग आहेत. स्पेनमधून यांत्रिक साहित्य आणण्याचा करार पाकिस्ताननें केला आहे. कराराप्रमाणें पाकिस्तानला कापडाची, विणण्याची, बांधकामाची, बिस्किटांची व इतर यंत्रसामुग्री मिळूं शकेल. पूर्व बंगाल्यांत तागाच्या गांठी बांधण्याची अधिक चांगली सोय करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें साखरेचा एक कारखाना काढण्याबद्दलहि विचार चालू आहे. पाकिस्ताननें आखलेल्या दीर्घ मुदतीच्या औद्योगिक योजना सफळ झाल्यास, आंतरराष्ट्रीय बाजारपेठ प्रतिकूल झाली तरी त्याचा परिणाम त्या राष्ट्राला फारसा भोगावा लागणार नाहीं.

---

## भोर स्टेट बँक लि. ची वार्षिक सभा

### चेअरमन श्री. म. त्र्यं. शिंगरे यांचें भाषण

"यापुढें गरजू लोकांच्या सोयी करणें बँकांना थोडेसें अडचणीचें जाईल, आणि सध्याची आर्थिक परिस्थिति लक्षांत घेतां कदाचित् व्यापार, उद्योग व उत्पादन यांमध्यें घट होईल, किंवा कसें याबद्दल शंका वाटते. माझे माहितीप्रमाणें इंग्लंडमधील बँकांवर बँक ऑफ इंग्लंडची कोणत्याही प्रकारची देखरेख नाहीं. माझ्या म्हणण्याचा असा उद्देश नाहीं कीं बँकांवर कोणाचीही कोणत्याही प्रकारची देखरेख नसावी. भक्कम पायावर देशांतील आर्थिक परिस्थिति उभारली जावी आणि समाजाच्या आर्थिक संचयाची सुरक्षितपणें गुंतवणूक व्हावी परंतु त्याबरोबरच समाजाच्या आर्थिक अडचणी दूर करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांचेवर व त्यांच्या व्यवहारांवर नियंत्रण घातल्यानें फायदा न होता समाजाची नडच होईल असें अनुभवावरून वाटतें. समाजांतील उद्योगधंदे, व्यापार इतर घटक यांना आपले स्वतःचें भांडवलाशिवाय बाहेरील भांडवल लागतें. हें भांडवल त्यांना दोन प्रकारचें लागतें. एक अल्प मुदतीचें व दुसरें मध्यम मुदतीचें. अल्प मुदतीचें भांडवल कदाचित् बँकांकडून त्यांना मिळेल, परंतु तेंही आतां मिळणें अडचणीचें जाईल असें वाटतें. मध्यम मुदतीचीं कर्जे आज देणारी बँकांसारखी दुसरी व्यवस्था नाहीं. यामुळें अल्प मुदतीचें भांडवल हें मध्यम मुदतीमध्यें गुंतविलें जातें, म्हणून निरनिराळीं कर्जे पुरविण्यासाठीं एकाच प्रकारची व्यवस्था असावी असें वाटतें.

### कर्ज वसुलीस कायद्याची मदत हवी

"अलीकडे कांहीं ठिकाणीं बँकांचें एकत्रीकरण करण्याच्या सूचना येऊं लागल्या आहेत. बँकांच्या एकत्रीकरणामुळें फारसा फायदा आहे असें नाहीं. बँका ज्या अस्तित्वांत आल्या त्या स्थानिक प्रयत्न, विश्वास व गरज यांचा विचार करून आल्या व त्या आपल्या परीनें काम करीत असतात व लहान लहान बँका आपल्या खातेदारांमध्यें सलोख्याचे संबंध लवकर निर्माण करूं शकतात. जेथें आपणांस ग्रामीण विभागांत बँकिंग पद्धतीचा प्रचार करावयाचा आहे तेथें तर एकत्रीकरण अगदीं अनवश्यक आहे. अल्प प्रमाणांत उद्योगधंदे करणाऱ्या समाजाला औद्योगिक क्षेत्रांत सनदशीर पद्धतीनें निर्भयपणें वावरतां येण्यास मोठमोठ्या बँकांचा उपयोग फार होणार नाहीं. बँकांवर ज्याप्रमाणें कायद्यानें असें बंधन घालण्यांत येत आहे कीं ज्यामुळें व्याजाचा दर, कर्ज देण्याची पद्धति, नवीन शाखा काढणें, यांवर नियंत्रण घातलें जात आहे त्याप्रमाणें सत्वर कर्जवसुलीची कायद्यांत कांहीं तरी योजना व्हावयास पाहिजे. तसेंच बँका जर खरोखर आर्थिक व्यवस्थेमध्यें अवश्य अशा घटक समजल्या जात असतील तर त्यांच्याद्वारा औद्योगिक व आर्थिक गरजांसाठीं भांडवल–पुरवठा, तसेंच त्यांचेवरील नियंत्रण मार्गदर्शनापुरतेंच असावें असें वाटतें. नाहीं तर लायक गरजवंतांच्या नडी–अडचणी भागविणें हेंही बँकांना दिवसानुदिवस दुरापास्त होईल असें दिसतें.

"आपले बँकेचे डायरेक्टर श्री. रावसाहेब खोले यांनीं आपले बोर्डानें पूर्वीच अनेक वेळां विनंति केल्याप्रमाणें गेले १–१॥ वर्ष आपला अमूल्य वेळ नियमितपणें खर्च करून आपल्या बँकेची जी सेवा केली व अशा दुर्घट काळांतही बँकेची जी प्रगति होत आहे त्याचें बरेचसें श्रेय त्यांना आहे असें आम्हां संचालक मंडळास वाटतें. त्याबद्दल त्यांना धन्यवाद देणें क्रमप्राप्त आहे."

### संयुक्त प्रांतांतील लोकरीचा धंदा

संयुक्त प्रांताच्या डोंगराळ भागांतून लोकरीचा धंदा चालतो. १९४६ सालीं हा धंदा मामुली व्यापाऱ्यांकडून काढून घेण्यांत येऊन सहकारी संस्थांकडे सोपविण्यांत आला. राज्याच्या उद्योग खात्याकडून ह्या संस्थांना बरीच मदत करण्यांत येते. तांत्रिक सल्लामसलत देणें, कच्ची लोकर गुदामापर्यंत पोंचविणें, इतर कच्चा माल पतीदर पुरविणें, सुधारलेलीं हत्यारें पुरविणें आणि पक्क्या मालाला बाजारपेठ मिळवून देणें इत्यादि विविध प्रकारची मदत खात्यातर्फे करण्यांत येत असते. १९४९–५० सालीं लोकरीच्या सहकारी संस्थांनीं जवळ जवळ १५६ मण लोकरीचें सूत निर्माण केलें, आणि ७,९९७ शिकाऊ कामगारांना लोकरीचें सूत कातण्याचें शिक्षण दिलें. खात्यातर्फे ११८ मण, १८ शेर लोकर बाजारांत विकण्यांत आली. ५२ मण कच्च्या लोकरीचें सूत बनविण्यांत आलें. खात्यातर्फे उत्पादन झालेल्या लोकरीच्या वस्तंची किंमत १,२९,१७१ रु. १२ आणे भरली. ६,९१३ कामगारांना शिक्षणाहि देण्यांत आलें गढवाल–नझीबाबाद लोकर–योजनेतर्फे ३५ मण लोकरीच्या सुताचें उत्पादन झालें व १०० मण लोकर विणकरांना पुरविण्यांत आली. हे आंकडे १९५०–५१ चे आहेत. तथापि पैशाच्या टंचाईमुळें ह्या भागांतील विणकऱ्यांचीं केंद्रें आतां चार ऐवजीं तीनच ठेवण्यांत आलीं आहेत. नझीबाबाद येथें ब्लँकेटस् तयार करण्याचा एक कारखाना उघडण्यांत आला आहे. डेहराडून जिल्ह्यांतील एका गांवींहि अशीच एक योजना १९४८ सालीं चालू करण्यांत आली होती. तिचीहि प्रगति होत आहे. डेहराडून जिल्ह्यांत आतां लोकरीचें सूत व कापड तयार करणारीं तीन केंद्रें आहेत.

संयुक्त प्रांत सरकारनें ह्या धंद्याची पुनर्घटना करण्यासाठीं एक कमिटी नुकतीच नेमली आहे. कमिटीनें एक पंचवार्षिक कार्यक्रम सुचविला आहे. ह्या पांच वर्षांच्या अखेर सहकारी संस्थांनीं ह्या धंद्यांतील व्यापारविषयक सर्व जबाबदारी आपणांवर घ्यावयाची आहे. ही जबाबदारी सध्या चालू असलेल्या सर्व केंद्रांबाबत घ्यावी लागणार आहे. सरकारचें उद्योगखातें इतर भागांतून ह्या धंद्याचा विकास करण्याकडे आपलें लक्ष वळविणार आहे. सध्याची आंतरराष्ट्रीय परिस्थिति फार नाजुक झालेली आहे. अमेरिका व इतर राष्ट्रें लोकरीसारख्या जरूरीच्या वस्तूंचे सांठे करूं लागलीं आहेत. त्यामुळें परदेशांत लोकरीला चांगलाच भाव येऊं लागला आहे. म्हणून सहकारी संस्थांना लोकर मिळण्यास अडचण पडूं लागली आहे. म्हणून लोकरीच्या निर्यातीस आळा घालण्यांत यावा अशी सूचना खात्यानें केलेल्या अहवालांत करण्यांत आलेली आहे. १९५१–५२ सालच्या लोकरीच्या धंद्याच्या अंदाजपत्रकांत कपात करण्यांत आली आहे. तथापि, अतिशय जरूरीच्या अशा कामांना पैशाची टंचाई भासूं देण्यांत येणार नाहीं. निर्यातीला आळा घालण्याच्या धोरणास अनुसरून १९५०–५१ सालीं अलमोरा जिल्ह्यांतून लोकर मुळींच निर्यात करण्यांत आली नाहीं.

**भारतीय चित्रपटांनीं डॉलर्स मिळवावे**—भारतीय चित्रपटाच्या निर्मात्यांनीं आणि वितरकांनीं चित्रपट परदेशीं पाठवून डॉलर्स मिळविण्याचा प्रयत्न करावा अशी सूचना श्री. एस्. के. पाटील ह्यांनीं केली आहे. सध्या निर्माण होणारे चित्रपट फारसे चांगले नसतात. गुणानें उच्च दर्जाचे चित्रपट निर्माण करण्यांत यावेत, असेंहि मत त्यांनीं व्यक्त केलें.


## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.








हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५११ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.